# अपिल

प्रति,

दिनांक :- १६/१२/२०१६

मान.महासंचालक साहेब,
माहिती व जनसंपर्क महासंचलनालय, मंत्रालय मुंबई
हिवाळी अधिवेशन शिबीर कार्यालय नागपूर.

विषय :- नागपूर विभागीय अधिस्विकृती समिती, अध्यक्षपदाबाबत.....

संदर्भ :- १) राज्य अधिस्विकृती समितीची दिल्ली बैठक - इतिवृत्त....
२) राज्य अधिस्विकृती समितीची शिर्डी बैठक - इतिवृत्त.....

महोदय ,

संदर्भ १ चे इतिवृत्त आम्हाला आज दि. १५ डिसेंबर २०१६ रोजी प्राप्त झाले. सदर इतिवृत्तातील नागपूर विभागातील अधिस्विकृती समिती अध्यक्षपदाचा श्री. कोरटकर यांचा राजीनामा मंजूर करून परस्पर अन्य सदस्यांची अध्यक्षपदी नियुक्ती केल्याच्या राज्यसमितीच्या कार्यवाहीबद्दल आम्ही याद्वारे लेखी अपिलात आक्षेप/हरकत नोंदवित आहोत.

वास्तविक महाराष्ट्र अधिस्विकृती नियमानूसार कोणत्याही विभागीय समितीच्या अध्यक्ष हा त्या संमधित विभागीय सदस्यामधून निवडण्याची तरतूद आहे. नागपुरच्या समितीच्या अध्यक्षपदी देखील श्री.प्रशांत कोरटकर यांची निवड पुर्वी याच नियमानुसार झाली होती.

श्री.कोरटकर यांनी वैयक्तिक कारणास्तव राजीनामा दिल्यावर त्यांच्या जागी नविन अध्यक्ष निवडण्याचा अधिकार नागपूरच्या विभागीय सदस्यांनाच आहे. हे ईथे आम्ही नम्रपणे या लेखीअपिलाद्वारे आपल्या निदर्शनास आणु देवू इच्छितो!

परंतू संदर्भ क्र.१ मधील इतिवृत्तात 'नवी दिल्ली येथे झालेल्या बैठकीत राज्यसमितीने श्री.कोरटकर यांच्या राजीनामा मंजूर करून त्यांच्या जागी अन्य सदस्य आदरनिय श्री.त्रिपाठी यांची अध्यक्षपदी एकतर्फी (रिपिट नियुक्ती) 'नियुक्ती' केली आहे.या परस्पर 'नियुक्तीला' व विभागीय समिती सदस्यांचे अधिकार डावलून एकतर्फी कार्यवाहीला आम्ही आक्षेप/हरकत नोंदवित आहोत.'

महाराष्ट्र राज्य अधिस्विकृती समितीची वरिष्ठता व आदर मान्य करून आम्ही त्या समितीचा पक्षपाती धोरणावर नम्रपणे आक्षेप/हरकत नोंदवित आहोत.

लातूर समितीबाबत निर्णय :-

महोदय, संदभ क्र. २ चे शिर्डी येथील राज्य समितीच्या बैठकीच्या इतिवृत्ताकडे आम्ही आपले लक्ष वेधू इच्छितो.... लातुर विभागीय अधिस्विकृती समितीचे अध्यक्ष श्री.प्रदिप नणंनकर यांनी राजीनामा दिला.त्यावर राज्यसमितीने 'लातूर समितीच्या अध्यक्षपदाचा निवडीचा निर्णय त्या समितीने बहुमताने घ्यावा'. असा निर्णय संदर्भ क्र २ च्या इतिवृत्तात नमूद आहे.

मग नागपूर समितीच्या बाबतीत देखील हाच निकष राज्य समितीने लावणे गरजेचे होते, पण तसे त्यांनी न करून नागपूर विभागावर .......*१) फक्त अन्यायच केला आहे.२) नागपूर विभागीय सदस्यांचे अध्यक्ष निवडण्याचे हक्क व अधिकार डावललेले आहेत.व असे करून लोकशाही पध्दत नाकारून एकाधिकार पध्दत अवलंबिली आहेत.३) नागपूर समितीवर आपला निर्णय 'लादला' आहे. ४) नागपूर विभागीय सदस्यांना सापत्न वागणुक दाखवून त्यांच्यावर अविश्वास दाखविला आहे.*

विनंती :-

राज्य अधिस्विकृती समितीने लातूर समितीत अशीच घटना घडली असतांना जो नियम त्यांना लावला तोच नियम नागपूर समितला लागु करून नविन अध्यक्ष बहुमताने निवडण्याचा निर्णय घ्यायला हवा होता.

महोदय, विनंती आहे की, आपण आपल्या अधिकारात लातूर समितीप्रमाणेच नागपूर विभागीय अधिस्विकृती समितीचा नविन अध्यक्ष निवडण्याचा (रिपीट-निवडण्याचे) अधिकार नागपूर विभागीय सदस्यांना द्यावे. ही विनंती.

विनित :-

(प्रशांत कोरटकर) (बंडूभाऊ लडके) (चेतन बैरम)

नागपूर
दिनांक :- १६.१२.२०१६

प्रत- माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव.
१) मा.माहिती व जनसंपर्क मंत्री (आद.मुख्यमंत्री,) हिवाळी अधिवेशन नागपूर कॅम्प, नागपूर.
२) संचालक वृत्त माहिती व जनसंपर्क व सचिव राज्य अधिस्विकृती समिती हिवाळी अधिवेशन नागपूर कॅम्प
३) संचालक नागपूर व अमरावती विभाग सचिव नागपुर विभागीय अधिस्विकृती समिती, नागपूर.